# देशीवाद, देशीयता, देशीयवाद संकल्पना व स्वरूप

डॉ. राजेन्द्र मुंढे साहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग यशवंत महाविद्यालय सेलू वर्धा

पत्ता : आर्वी नाका , ज्ञानेश्वर नगर , वार्ड ९, वर्धा

सारांश {abstract}

देशीयवाद, देशीयता आणि देशीवाद हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. त्याविषयी अधूनमधून उलटसुलट लिहिलेही जात असले , तरी अनेक वर्षापासून हे होत असले तरी देशीयवादाची पूर्णपणे सुस्पष्ट मांडणी झालेली नाही असे म्हणावे लागते . त्यादृष्टीने एक प्रयत्न म्हणून प्रस्तूत निबंध लिहला आहे. देशीयवाद ही एक विचारसरणी असून, मूल्य संकल्पना आहे . देशीवाद ही संकल्पना मानववंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय असून तिचा संबंध हा सांस्कृतिक अस्मिता आणि देशीयवाद ही संकल्पना व समाजशास्त्र मानववंशशास्त्र यातून वाङ्मयात आलेली आहे. जागतिक वाइमयाप्रमाणेच भारतीय भाषांमधूनही देशीयवाद विषयक संकल्पनेची चर्चा आणि त्याद्वारे वाङ्मयाची समीक्षा होऊ लागली.ती तशीच रूढ होऊ लागली त्यालाच देशीवाद म्हटले जाऊ लागले . देशीवाद म्हणजे नेमके काय याचाही शोध प्रस्तुत निबंध लेखकाने घेण्याचा प्रयत्न केला आहे .

बीज संज्ञा (Key World}

मराठीमध्ये भालचंद्र नेमाडे यांनी 'देशीयवाद' ही संकल्पना प्रथमत मांडलेली दिसते. देशीयवादाची विचारसरणी मांडताना काही संज्ञाचा वापर केला जातो देशीयवाद ही मुख्य संकल्पना मानली तर त्यात देशीयतेचा मूल्यविचार केंद्रस्थानी असतो. म्हणून देशीयवाद आणि देशीयता मूल्यविषयक मानायला हवी. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मूल्ययुक्त परिभाषिक शब्दांना आपण मूल्य संज्ञा मानायला हवे. याचे विश्लेषण प्रस्तुत निबंधात केले आहे.

## शोध निबंधाची वैशिष्ट्ये ( Objective of Research Paper )

देशीयवाद-देशीवाद ह्या संज्ञांचा शोध घेऊन त्याची माडणी करणे हे प्रमुख वैशिष्ट्य आहे . देशी-देश्य वस्तु, कला, साहित्य, संस्कृती ओळख आणि अस्तित्व सिद्ध करणारी ही संज्ञा आहे. जसे खेड्यातील चंची, डोक्यावरचे पागोटे, धोतर, लुगडे, चोळी आदी अजिंठा चित्रशैली, भारतीय संगीत, आदिवासी कला, रामायण, महाभारत, हिंदुस्थानची बहुसांस्कृतिकता, संस्कृतीची अध्यात्मिक आणि नैतिक बैठक समाविष्ठ असते .देशीपणा : देशी देश्य वस्तु, कला, साहित्य संस्कृती ह्यात देशीपणा असतो. देशीपणा होच देश्य असण्याची खूण असते म्हणून देश्य, देशी आणि देशीपणा ह्या पुरक संज्ञा

आहेत. देशीपणा हा स्वाभाविक आणि नैसर्गिक म्हणून ती गुणात्मक सज्ञा नाही. देशीपणा हे एक सर्वसामान्य असे सामाजिक तत्त्व आहे.

देशीकरण आपले देशीयत्व, देशीपण कायम ठेवून जेव्हा एखादी संस्कृती परसस्कृतीच्या मौलिक घटकांना आपल्या प्रमाणकांच्या मुशीत जोखून स्वीकारते, तेव्हा देशीकरणाची प्रक्रिया स्वाभाविकपणे पार पडत असते अर्थात आपले तत्त्व शाबूत ठेवूनच ही प्रक्रिया पूर्णत्वास जाते. देशीयता: ही गुणात्मक संकल्पना आहे. कारण देशीयतेत मूल्यव्यूह अध्याहत असतो. देशीयतेचा मूल्यब्यूह हा बहुमुखी आणि बहुगुणी असतो. त्यात भूमी, भौगोलिकता, मातृभाषा, संस्कृती, परंपरा, लोकजीवन आदीचा एकत्रितपणे विचार अपेक्षित असतो.

देशीवाद आणि देशीयवाद: "देशी या शब्दाची वाद जोडला की देशीवाद होतो. केवळ देशी असणे देशीपणाचा वाद निर्माण करणे, हा अर्थ संदिग्ध आहे. म्हणून नेटिव्हिजम-देशीवाद या शब्दाचा वापर नेमाडेंनीही टाळला असावा. देशीयतेचा आग्रही मूल्यविचार मांडणारी संकल्पना म्हणजे देशीयवाद होय, असा अर्थ संयुक्तिक आहे. म्हणून डॉ. किशोर सानप यांनी देशीयवाद ही संकल्पना वापरली आहे.

देशीयवाद ही विचारसरणी आहे. देशीपतेचा मूल्यव्यूह देशीयतेच्या मध्यवर्ती विचारधारेत अध्याहत असतो. देशी-देश्य, देशीयता, देशीपणा, देशीकरण, देशीवाद, देशीयवाद अशा संज्ञाया शब्दांचा वापर देशीयवादी विचारसरणीच्या प्रतिपादनासाठी केला जातो. हे शब्द देशीयतेशी निगडीत असणारी मूल्यव्यवस्था निर्देशित करण्यासाठी वापरले जातात. देशी या शब्दाचा असा ब्वनदजतल इंग्रजी पर्याय असला तरी छमनपभम असा इंग्रजी एक पर्याय वापरला जातो. देशीयता या शब्दाला मात्र छमजपअपबअजल तर देशीपणाला छमजपअपजल असा इंग्रजी पर्याय वापरला जातो. देशीयवाद या संज्ञेसाठी इंग्रजीत छमजपअपेउ असा पर्याय वापरण्याचा प्रपात आहे. फादर कामिल बुल्के यांच्या इंग्रजी हिंदी शब्दकोशात तर छमजपअपेउ या इंग्रजी शब्दाचा हिंदी पर्याय म्हणून देशीयता असा शब्द दिला आहे.

नेटिव्ह म्हणजे केवळ मूळनिवासी नाही तर त्यांच्यासह अनेक त्या त्या भूमीवर जन्मले तेही, असा अर्थ हिंदुस्थानातल्या नेटिव्ह-देशी लोकांच्या संदर्भात घ्यावा लागतो. म्हणूनच देशीयवाद या शब्दाचा छमजपअपेउ इंग्रजी पर्याय हिंदुस्थानी देशीयवाद या शब्दाला पुरेसा समर्थक ठरत नाही.नेटिव्ह या शब्दाचा ऑक्सफर्ड शब्दकोशात, "नेटिक एखाद्या देशाचा मुळचा वा नेहमीचा रहिवासी, जो परकीय आणि परदेशी लोकांपासून वेगळा समजला जातो. हल्ली विशेषतः बिनयुरोपी आणि कमसंस्कृत अथवा असंस्कृत रानटी वंशाचा, काळसर (कलर्ड) किंवा काळा माणूस" असा जो दिला आहे. तो मूळ रहिवाशांना युरोपात आणि जगातही रानटी, आदिवासी, मागासलेले, काळे म्हणून हिणवण्यासाठी आहे. हा वंशवादी अर्थ भारतातल्या देशी लोकांना लागू होणार नाही, कारण भारतात मूळ रहिवासी कोण? या विशाद्य प्रश्न मानला जातो. खरे तर हिंदुस्थानात शेकडो धर्म, वंश, भाषा, संस्कृती, परंपरा असलेले करोडो लोक गुण्यागोविंदाने राहतात आणि हिंदुस्थानची देशीय

परंपरा आणि संस्कृती संपूर्ण जगाच्या पाठीवर कुठेही आवळगार नाही. म्हणूनच नेटिव्ह हा शब्द जसा अपूरा ठरतो, तसेच नेटिव्हिजम हा शब्दही हिंदुस्थानी देशीवादाचे स्वरुप स्पष्ट करण्यास समर्पक ठरत नाही. या विषयी डॉ. किशोर सानप म्हणतात, "हिंदुस्थानी देशीयवादाची मूल्यव्यवस्था निर्देशित करण्यासाठी जी संज्ञावली–देशीयवाद, देशीवाद, देशीयता, देशी–देश्य, देशीकरण, देशीपणा आदींसाठी इंग्रजीत वापरायची असल्यास, ह्याच हिंदुस्थानी सज्ञांना इंग्रजीत लिहिले पाहिजे आणि इंग्रजांनाही आपल्याच संज्ञा वापरण्यास भाग पाडले पाहिजे. जसे, देशीयवाद या शब्दासाठी असा कमीपलुंक इंग्रजी पर्याय वापरला पाहिजे. हाच खरेतर देशीयतेचा अस्सल वाणा असतो आणि त्यातूनच देशीयवादही आग्रही भूमिका पुढे येते. ह्याच पद्धतीच्या विचाराला देशॉयवाद म्हणता येईल अशा तऱ्हेने डॉ. किशोर सानप यांनी देशीयवादाला देशीयवाद असा शब्दप्रयोग करून देशीयवादात अस्मिता आणि अस्तित्वाचा आग्रही दुष्टीकोन बाळगला जातो. देशीयवाद हा अशाच आग्रही अंगाने सिद्ध करावा लागतो. याचेही स्पष्टीकरण दिले आहे. देशीयता ही जशी स्वयंसिद्ध संकल्पना असते, तशी देशीयवाद ही संकल्पना नाही. ती आग्रही दुष्टीकोणातून, चळवळीतून, अस्मिता, अस्तित्त्वाच्या आत्मतेजातून वर येणारी विचारप्रणाली असते. आणि ती सिद्ध झाल्याशिवाय तिला मूल्यविचारांचे रुप तर प्राप्त होत नाही; परंतु मूल्य निर्मितीचे कार्यही तिला समाजात त्याशिवाय करता येत नाही हे स्पष्ट केले आहे.

प्रास्तावना **(Introduction)**

खऱ्या अर्थाने भारतीय साहित्यात देशीयवादाची संकल्पना विसाव्या शतकात चर्चेत आल्याचे दिसते, तर मराठीत ही संकल्पना डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी साठोत्तर मराठी साहित्य चर्चेत रुजवली. विद्यापीठे व चर्चासत्रांतून यावर चर्चितचर्वण होऊ लागले. नागपूर येथे २ व ३ मार्च २००६ रोजी आयोजित देशीवाद आणि मराठी साहित्य यावरील चर्चासत्र महत्त्वाचे ठरले. गेल्या पाव शतकात ही संकल्पना चर्चेत असूनही तिच्याबद्दल अनेक संभ्रमच अस्तित्वात आले आणि भाषासाहित्यातही दोन वर्ग तयार झाले

एक वर्ग देशीयवादाचा पुरस्कार आग्रही मानतो तर दुसरा वर्ग देशीयवाद ही संकुचित आणि अस्पष्ट अशी संकल्पना असून देशीयवादी अशी विचारप्रणालीच अस्तित्वात नाही आणि तो नाही म्हणून काहीही बिघडत नाही, अशा मतांचा हा वर्ग आहे. रा. भा. पाटणकर, म. सु. पाटील हे विचारवंत या पहिल्या वर्गाचं प्रतिनिधित्व करतात तर आनंद पाटील, हरिश्चंद्र थोरात, विलास सारंग आदींनी ही संकल्पना संभ्रम निर्माण करणारी असून ती संकुचित असल्याचे प्रतिपादन केले आहे. प्रा अशोक बाबर यांनी देखील देशीवादावर सखोल लेखन केले आहे ,मोतीराम कटारे यांनी देशीवादाला एका विवक्षित दृष्टीकोनातून जोखले आहे . अलीकडील काळात डॉ रावसाहेब कसबे यांनी देशीवादाच्या निमित्ताने त्याच्या पुरस्कर्त्यांवर जबरदस्त हल्ले चढविलेले दिसतात .

प्राचीन भारतीय साहित्याचा विचार करता भरतमुनीने आपल्या नाट्यमिमांसेत देशी आणि मार्गी हे शब्द वापरलेले दिसतात. देशी म्हणजे विशिष्ट भूप्रदेशाशी निगडित तर मार्गी

म्हणजे मार्ग दाखविणारी किंवा संस्कृत, देशी हा शब्द ज्ञानेश्वरादी संतांनी अनेकदा वापरला आहे. "देशीयतेची संकल्पना मात्र अगदी आधुनिक काळातील वसाहतवादाच्या यावहतेची जाणीव झाल्यानंतरच निर्माण झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. मुख्यतः मानववंशशास्त्रात वापरता असलेली ही संकल्पना नंतर समाजशास्त्र, राज्यशास्त्र व साहित्यादी कलांच्या अभ्यासाने अधिकच दुढ व व्यापक होत गेलेली दिसते. त्र्यं. शं. शेजवलकरांच्या मते, रक्षिण्यासारखे असे स्वतंत्र आपले काहीतरी आहे. अशी मनोभावना जिवंत असल्याखेरीज कोणत्याही मानववंश स्वतंत्र अस्तित्त्वात राहू शकणार नाही. ही मनोभावना जिवंत ठेवणारे तत्त्व म्हणजेच देशीयता होय. तर डॉ. किशोर सानप यांच्या मते, "देशी–देश्य ह्या संज्ञा कोणत्याही वस्तू-कला-साहित्य-संस्कृतीची ओळख अधोरेखीत करण्यासाठी वापरल्या जातात, देशीपणा ही गुणात्मक अशी संकल्पना नाही. देशीयता ही संकल्पना मात्र गुणात्मक आहे. देशीयता ही संकल्पना देशीयतेचा मूल्यविचार अघोरेखित करणारी म्हणूनच वापरायला हवी. देशीयतेचा मूल्यविचार-मूल्यव्यूह हा बहुमुखी असतो म्हणून देशीयतेच्या मूल्यपुजांचेच भान ह्या संज्ञेच्या वापरात असले पाहिजे, देशीवाद ही संज्ञा केवळ देशी याच एका शब्दाशी निगडीत असून देशीयवादाचे पूर्णरूप व्यक्त करू शकत नाही. म्हणून देशीयवाद अशी संज्ञा वापरल्यास देशीयता या शब्दाशी वाद निगडित होतो आणि देशीयता म्हणजे देशीय मूल्यविचारांचा समूह आणि त्यासंबंधीची विचारसरणी आग्रहाने प्रतिपादित करणारी संकल्पना, असा देशीयवादाचा अर्थ देता येईल. याच संदर्भात सदर निबंधात हीच संज्ञा वापरली आहे. संदर्भ देतांना मात्र त्या त्या लेखकानं वापरलेल्या संज्ञा कायम ठेवल्या आहेत.

विषय विवेचन (Subject Analysis)

देशीयता ही समाजाच्या प्रत्यक्ष जगण्याशी निगडित असलेली अपरिहार्य प्रक्रिया आहे. आणि समाजाच्या सामुहिक जगण्यातून ती व्यक्तिगत आणि सामूहिक रुपातून आविष्कृत होते. जेव्हा एखादा समूह आपल्या नैसर्गिक घटकांना आपल्यात सामावून सांस्कृतिक पर्यावरणात जगत असतो तेव्हा तो नैसर्गिकपणे देशीय जीवनाचाच अंगिकार करीत असतो. समूहाचा सामाजिक, आर्थिक कलाविषयक ह्या सर्व मानवी जीवनाशी निगडित असलेल्या क्षेत्रावर नैसर्गिक आणि स्वाभाविक अशा देशीमूल्यांचा प्रभाव असतो. देशीयतेचा जीवन व्यवहारातून होणारा आविष्कारही तितकाच सहजस्वभावी असतो. जेव्हा दुसरी देशीय किंवा परकी संस्कृती, एखाद्या देशीय संस्कृतीवर आक्रमकपणे हल्ले करते आणि त्यामुळे समूहाचे सांस्कृतिक जीवनच धोक्यात येत असेल, संस्कृतीच्या सर्वच क्षेत्रांवर म्हणजेच भाषा, साहित्य, जीवन व्यवहार, कला आदींवर वर्चस्व कुणी संस्कृती गाजवत असेल, तर अशावेळी वर्चस्वाखाली दबलेली आणि दडपली जाणारी संस्कृती बंड करते आणि आपली भाषा संस्कृती हीच श्रेष्ठ असल्याचे आग्रही प्रतिपादन करते: तेव्हा देशीयवादी चळवळीचा जन्म होतो. आणि जीवनाच्या सामाजिक-राजकीय आर्थिक कालविषयक आदी क्षेत्रांतून देशीयतेचे अभिमानी पुढे येतात आणि आपल्या संस्कृतीचा जाणीवपूर्वक आविष्कार करण्यासाठी पूर्णशक्तीने समाजाच्या सर्व क्षेत्रातील आविष्कार माध्यमांना आवाहन करून नेतृत्व करीत देशीय मूल्यांची

पाठराखण करतात. देशीयवादाच्या या विवेचनाची उलट-सुलट मांडणीतून डॉ. किशोर सानप यांनी एक सुस्पष्ट अशी देशीयतेच्या तत्त्वांना मूल्यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून व्याख्या दिली आहे.

"देशीयबाद ही अशी मूल्यव्यवस्था आहे की, जिच्यात भूमितत्त्व, भौगोलिकता, भाषा, वंश, धर्म-आध्यात्मिकता- पारलौकिकता, परंपरा, ऐतिहासिकता, संस्कृती, संस्कृतिसंयोग, देशीकरण, स्थितिशीलता, गतिशीलता, आधुनिकता, आक्रमकता आदी मूल्यांना प्रेरित आणि प्रभावित करून सामाजिक माध्यमांतून आणि कलामाध्यमांतून त्यांची एकसमयावच्छेदेकडून आविष्कार करणारी मूल्यनिष्ठ आणि मूल्यनिर्मिती करणारी मानवी समूहाला अस्मिता, अस्तित्त्व, आत्मतेज, आत्मसन्मान, जाज्वल्यवृत्तीचे तीव्र आणि आग्रही भान देणारी विचारप्रणाली होय."

देशीयवादाची डॉ. किशोर सानप यांनी उपरोक्त व्याख्या देशीयवादाची विस्तृत भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करणारी आहे. यावरून देशीयवादाला एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे आणि ते सामाजिक आणि मानवी समूहाच्या कल्याणाचाचा विचार करणारे आहे. या व्याख्येतून जगाच्या व्यवस्थेत आपलं अस्तित्त्व धोक्यात आल्यावर, स्वतःची स्वतंत्र ओळख सिद्ध करण्याच्या प्रेरणेतून देशीयवादी विचार जन्माला येतो. हे स्पष्ट होते तर प्रत्येक मानवी समूह आपली वैयक्तिक आणि सामूहिक ओळख सिद्ध करण्याचे माध्यम म्हणून तो देशीयवादी मूल्यांचा आधार घेतो. देशीयवादी विचार आणि तत्संबंधीत चळवळी ह्या समाजात मूल्यनिर्मितीचं कार्य करतात. हे सर्व खरं असलं तरी, देशीयवादी विचारसरणीला काही मर्यादाही असतात. देशीयवादाला तत्त्वज्ञानाचं आणि मूल्यविचारांच्या साक्षातीकरणाचं प देताना तिच्यातील गुणदोषांसह देशीयवादी विचारसरणी रुढ होताना दिसते.

देशीयवादाची सैद्धांतिक मांडणी:

बहुस्तरीय बहुकेंद्रो संकल्पना असणाच्या देशीयवाद किंवा देशीयवादात अनेक मूल्याचा तत्त्वांचा समावेश करता येईल स्थूलमानाने देशीयवादी संकल्पनेचा मूल्यविचार-मूल्यव्यूह पुढीलप्रमाणे मांडता येणे शक्य आहे. आजवरच्या देशीयवादी विचारांच्या जगराच्या मांडणीच्या परिप्रेक्ष्यात पुढील तत्त्वांची चर्चा करण्यात आली आहे. ह्या सर्व मूल्यव्यूहातून देशीयवादी जाणिवा आविष्कृत होतात. देशोयवादात अंतर्भूत होणारी मूल्ये सुद्धा स्थिर आणि चिरंतन अशी नाहीत. ती परिवर्तनशील आणि कालमानाने बदलणारी व्यवस्था कधी स्वीकारून तर कधी नाकारून आपल्याला जे जे पोषक आहे आणि आपले अस्तित्व, अस्मिता ज्यामुळे अविचल राहिल, अशाच घटकांना आपल्यात जिरवून ही मूल्यव्यवस्था गतिशील परिवर्तनशील-कालसापेक्ष आणि भविष्याचाही विचार करणारी असते. देशीयतेच्या मूल्य-जाणिवांमध्येही हजारो वर्षापासून कधी सौम्य तर कधी तीव्र असा संघर्ष सुरु असतो. आणि त्यातूनच तावून सुलाखून देशीयतेचे रूप साकार होत असते.

मूल्यसंघर्ष हा देशीयतेचा एक अटल पैलू असून तो देशीयतेला समाजसन्मुख आणि कालसन्मुख करण्यासाठी उपयोगी ठरतो. मानवी जगण्याचे स्रोत समृद्ध करीत, देशीयता कधी मूर्तपणे तर कधी अमूर्तपणे आविष्कृत होत असते. देशीयता ही समाजात जाणिवांच्या रुपात

आविष्कृत होते आणि तिचा अनिवार्य परिणाम काल, साहित्य आदि सांस्कृतिक पर्यावरणावर होत असतो. नैतिकता, सत्य, परोपकार, करुणा, कल्याण, सेवा, साहित्यातील सर्जनशीलता ह्या गोष्टी माणसांत देशीयतेच्या कभी मूर्त तर कधी अमूर्त अशा मूल्यकोषातून येतात, त्या कधी संस्कृती भाषा परंपरेन येतात. देशीय मूल्ये समाजावर सस्कार करीत समूहाची जीवनशैली घडवितात. काही नैसर्गिक गुणसूत्रे असे असतात त्याच्या नकळत त्याच्यात स्वाभाविकपणेच अवतरतात. या विषयी तो बेमालूम असतो. अशातऱ्हेने मानव वैयक्तिक आणि सामूहिक रुपात नैसर्गिक परिप्रेक्ष्यात पडत असतो. एकंदरीत, देशीयता ही माणसाला व्यक्तिमतपणे आणि सामूहिकपणे विशिष्ट देशीय वर्तुळात त्याचं मानवी अस्तित्व घडविण्यास उपकारक असणारी महाव्यवस्था आहे. ती ज्या मूल्यांनी आकाराला येते तौ पुढीलप्रमाणे-

भूमितत्व: भूमी सर्वच वंशजातीधर्माच्या लोकांना सामावून घेणारे आणि त्यांना जागवणारे तत्त्व असते. भूमीचा प्रकोप झाला तर तो तिचल्या सर्वांनाच भोगावा लागतो. भूमी हे मानवी समूहाला जगण्याला नियंत्रित करणारं अतूट असं तत्त्व आहे. देशीयतेत नेमाडेनी भूमीतत्त्व महत्त्वाचं मानलं आहे. भूमी हीच माणसाची ओळख आणि अस्तित्त्व सिद्ध करणारी व्यवस्था आहे.

भौगोलिक तत्त्व : भूमितत्त्वाला भौगोलिक मर्यादा असतात, भौगोलिकता आणि भूमीच्या एकरुपतेतूनच भूमी सृजनशील होते आणि तिथली माणसंही सर्जनशील होतात. नैसर्गिक अनुकूल-प्रतिकूलतेतही विशिष्ट प्रदेशातील माणसं नैसर्गिकपणे वाटयला आलेल्या भौगोलिकतेत सुखासमाधानानं जगतात. भौगोलिकताही मानवी समूहाचं जीवन नियंत्रित करणारी नैसर्गिक यंत्रणा असते. परिसरात अस्तित्त्वात येणाऱ्या संस्कृतित भौगोलिक घटकाचा मोठा वाटा असतो आणि देशीयतेला ओळखण्याचेही ते एक अपरिहार्य तत्त्व असते.

भाषा तत्त्व : भाषा तत्त्व हे देशीयतेच्या आविष्कारासाठी असलेले प्राणतत्त्व आहे. व्यक्त झाल्याशिवाय कुणाची ओळख पटू शकत नाही. म्हणून भाषा तत्त्व हे देशीयतेत मुख्य भूमिका बजावणारे असते. भाषेतूनच माणूस व्यक्त होतो आणि मुक्तही होतो. मातृभाषा हीच खरेतर व्यक्त आणि मुक्त होण्यासाठी माणसानी वापरली पाहिजे. देशीयता ही मातृभाषेचा आग्रह धरते. मातृभाषा ही सर्वत्र एकच एक चेहऱ्याची नसते. दर बारा कोसावर भाषा बदलते. भाषेचे अनेक प्रकार आणि स्वर एका महाराष्ट्र दिसून येतील, बोली आणि मराठी अशी मिळून त्या त्या प्रदेशाची देशीय भाषिक अस्मिता सिद्ध होत असते. मातृभाषेशिवाय आपल्याला अधिकाधिक भाषा आल्या तर आपल्याला हजारो लोकांचे प्रदेशांचे देशाचे जीवन समजून घेता येईल, आणि स्वतःलाही समृद्ध करता येईल, हा भाषाविचार गांधी-विनोबांनी मांडला आणि प्रत्यक्ष आचरणावही आणला होतो. भाषेचे तत्त्व असे व्यापकपणे आणि अंगभूतपणे देशीयतेच्या संदर्भात सथात असावे लागते. भाषा ही मूळातच अन्य भाषांचा आदर करीत आणि आपल परक न मानता उपयुक्त भाषा व्यवस्था स्वीकारत स्वत:लाही समृद्ध करीत असते. शेवटी देशी भाषा तत्त्व हे देशीयतेच्या आविष्काराचे तत्व असते.

वंश तत्व: देशीयतेत वंश तत्त्व क्वचीतपणे पाळले जाते. एक वंश दुसऱ्या वंशाचा सन्मान करीत असतो. भारतीय दृष्टिकोनातून तो करणे हे माणूसपणाचेच लक्षण असते. आपल्या देशावर अनेकांनी आक्रमणे केली आणि त्या सर्व आर्य, हूण, मोगल, पोर्तुगीज, इंग्रज आणि अन्यही देशावल्या अमेरिकन, रशियन, चिनी, जपानी, अफगाणी लोकांनी त्यांची भूमी आणि भाषा हिंदुस्थानात नसूनही हिंदुस्थानात राहणे पसंत केले. याचे कारण येशील मानवतावाटी, सहिष्णू आणि सर्वसमावेशक सर्वधर्म जाती संप्रदाय यास असलेली मुभा होय ही हिंदुस्थानची अस्सल देशीय अस्मिता आहे. ओळख आहे.

ऐतिहासिक तत्व: देशीयतेत ऐतिहासिक भूतकाळ हे मूल्य अभ्याहत असते. देशीकरणाच्या प्रक्रियेतून इतिहासाच्या पटनाप्रसंगांना आणि मानवी समूहाला प्रेरणादायक असे अमृतानुभव मिळावे ही मुख्य प्रेरणा त्यामागे असते शीयवेत ऐतिहासिकत्वाचा अभिमान बाळगला जातो. भूतकाळावर स्वप्नाळू प्रेम करण्याची प्रवृत्ती देशीयवादात दिसते भूतकाळातून ज्या संस्कृती परंपरा मानवी जीवनाचे कल्याण साधण्यासाठी कालावीत असतात त्यांना खरेतर देशीयतेत स्थान असते देशीयतेच्या विवेकवादी दृष्टिकोनाचा अंगीकार करणाऱ्या देशीयवादी चळवळी, भूतकाव्यातील परंतु वर्तमान वि याला उपकारक ठरणाच्या निवडक घटकांचे अस्तित्व चिरस्थायी टिकविण्यासाठी प्रयत्नशील असतात. जसे संतचळवळीने भूतकाळातून ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या प्रेरणा विरस्थायी करण्यासाठी सातशे वर्ष प्रयत्न केले, परंपरा तत्त्व परंपरा ह्या लोकजीवनातून आणि लोकजीवनाला नियंत्रित करणाऱ्या भूमीतत्त्व-भौगोलिक तत्त्व आदीमधून तयार होतात. परंपरा ह्या कालसंबद्ध आणि कालसापेक्ष तयार होतात. दीर्घ कालखंडावर त्या परिणाम करणाऱ्या असतात. समाजाच्या जीवनातच परंपरा तयार होतात आणि त्या कालांतराने परंपरा म्हणून रद होतात देशीयतेचा मूल्यविचार हा परंपरेतूनच स्वतला अद्ययावत करीत टिकून राहतो. देशीयवादात बहुजन देशीयतेला प्राधान्य देण्याचा विचार केंद्रस्थानी असल्यामुळे बहुजन देशीयवादी विचारधारेला मान्य असणाऱ्या समता, बंधूता - स्वातंत्र्य या मूल्यत्रयौला स्थान देणाऱ्या परंपरांच्या आविष्काराला देशीयतेत महत्त्व दिले जाते.

संस्कृती तत्त्व: संस्कृती ही बहुकेंद्री मानवी व्यवस्थांचे जाळे असते. संस्कृती ही स्थिर, अचल आणि भौतिक अशी नसते तर तिच्याच भौतिक आणि आधिभौतिक जीवन नियंत्रित करणाऱ्या अनेक व्यवस्थांचे जाळे विणलेले असते. समाजावर संस्कार करून समाजाला सुसंस्कारीत करण्याची कृती संस्कृतीमध्ये अपेक्षित असते. संस्कृती ही चिरंतनपणे आपल्या पोटात सर्वकाही रिचतव पडतझडत आपले नवे रूप सिद्ध करीत परिवर्तनशील आणि सर्वसमावेशक होण्याकडे तिचा कल असतो.

संस्कृतिसंयोग तत्त्व : संस्कृती म्हणजे परस्पर सहकार्य करणाऱ्या अनेक व्यवस्थांचे जाळे असल्यामुळे सर्व बाह्य प्रभावांना आत्मसात करीत देशीकरणाच्या प्रक्रियेतून स्वतचे अस्तित्व अबाधित राखून आडव्या उभ्या धाग्यांनी गुंफलेली अंगभूत रचना असते. जिवंत जोमदार संस्कृतीमध्ये संकृतिसंयोगातून स्वतला समृद्ध करण्याचे सामर्थ्य असते. संस्कृतिसंयोग किंवा संस्कृति

संपर्क न टाळता येण्यासारखी अपरिहार्य बाब असते आणि एकमेकाशी सहकार्य करीत मानवी समूहांची जीवनशैली पृथकपणे आणि एकत्रितपणे जोपासून जीवनावश्यक घटकांच्या मदतीने विविधतेत एकठा शोधण्याचा ध्यास घेण्याची प्रक्रिया संस्कृतिसंयोग संपर्कात असते. भारत हे याचे मोठे उदाहरण आहे.

देशीकरण तत्त्व : संस्कृतीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जोमदार आणि जिवंत संस्कृती संस्कृतिसयोगातून आणि संस्कृतिसक्रमणातून निवडक व्यवस्था स्वीकारत आपल्या अस्सल पोत अधिक जोमदार आणि भक्कम करते संस्कृतीचा पोत अधिक जोमदार, साधात, जिवत आणि मानवी समूहाला उपकारक असा करण्याची जो संस्कृतच्या अंगी मूलभूत शक्ती असते तीच देशीकरणात कार्यरत असते. बाहेरील प्रभाव पचवून त्यांना आपल्याच रूपात त्यांचा स्वीकार करताना त्यांचे देशीकरण करण्याची प्रक्रिया सुरु असते आणि देशीकरण केल्याशिवाय मूळ संस्कृतीला आपली महत्ताही टिकवून ठेवणे शक्य नसते. देशीकरण हे बाहेर प्रभाव आपल्या प्रमाणकांनी पचवून आणि आपले अस्तित्त्व अस्मिता कायम ठेवत, संस्कृतीला समृद्ध करण्याचे संस्कृतीचे माध्यम असते.

धर्म तत्त्व : धर्म हे देशीयतेच्या केंद्रस्थानी असणारे तत्त्व असून संस्कृतीची रचना हीच मुळात धर्माच्या अनुषंगानेच होत असते. वंश किंवा जातिव्यवस्था आणि देशव्यवस्था ह्या दोन्ही व्यवस्थांना मुख्यत धर्माचा आधार असतो. धर्माशिवाय आणि जातिशिवाय माणसाची ओळख पटणेच दुर्लभ असते. म्हणून देशीयतेच्या विचारधारेत आज जरी धर्माचा विचार गंभीरपणे होत नसला, तरी एकोणिसाव्या शतकापर्यंत तरी जगात धर्माच्या आधारे अस्मिता निश्चित होत असे. देशीयतेत विविध धर्मानो सिद्ध केलेली संस्कृती केंद्रस्थानी असते. तसेच नैतिक आध्यात्मिक पायाभूत व्यवस्था असलेल्या सर्वसमावेशक धर्म हा देशीयवेच्या केंद्रवर्ती विचारांना प्रभावित करणारा असतो.

गतिशील तत्त्व : देशीयतेचे मूल्यविचारात गतिशीलतेचे एक तत्त्व अंतर्भूत असते. देशीकरणाची प्रक्रिया ही गतिशील आणि त्यांना आपल्या मूल्यांमध्ये रुजवत गतिशीलता आकाराला येते. देशीयता हो सकारात्मक आणि नकारात्मक रुपात समाजात दिसून येत असली तरी गतीशिलता टाळून देशीयता समाजात रुजू शकत नाही. गती, परिवर्तन, बदल ही लक्षणे असल्याशिवाय देशीयता कालसापेक्ष रुपात अस्तित्वात येत नाही. गतिशिलता ही देशीयतेचे नवोन्मेषशाली कालसंगत रूप अस्तित्वात येण्यासाठी आवश्यकही असते.

आधुनिकता तत्त्व : आधुनिकता, सुधारणा, जागतिकरण, उदारीकरण, राष्ट्रीयता, आंतरराष्ट्रीयता, भारतीयता आदी; सुधारणावादी आणि बाह्यरुपात अत्यंत आकर्षक आणि प्रभावी वाटणाच्या ह्या संकल्पना नेहमीच देशीय तत्वज्ञानाला जाणीवपूर्वक विरोध करीत असतात किंवा जगाचा पोशिंदा हजारोंच्या संख्येने आत्महत्या करु लागला आहे. तर जगण्याच्या अनेक समस्या उभ्या ठाकल्या आणि ह्या सर्व जागतिकीकरणातून आदिवासी शेतकरी भूमिहीन मजुर- शुद्रातिशूद्र असा बहुजनवादी वर्गच शोषणयंत्रात आज भरडला जात आहे. गांधीजींनी अशा आधुनिकीकरणाचा

विरोध करीत हिंदुस्थानात स्वदेशीची चळवळ उभी केली होती. आपल्या हिंदुस्थानाचा कणा असलेली नैतिकता ही कर्तव्य तत्परतेची आणि भूतदयेची मानवतावादी प्रेरणा देणारी व्यवस्था असूनही आणि आपल्या सुखांवर भोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मनाचा पिंड आध्यात्मिकतेने घडविणारी देशीय धर्म संस्कृती व्यवस्था कार्यरत असूनही ह्या देशातल्या बहुसंख्य लोकांना जगण्याचा नैतिक आधारच ह्या जागतिकीकरणाने आधुनिककीकरणाने उघडून फेकला. म्हणूनच अशी ही आधुनिकता नको आहे तर हिंदुस्थानाला समग्र गिळून टाकणारी ही आधुनिकता आणि सुधारणा ह्या देशातून घालवण्यासाठी देशीयता हे एक प्रभावी असे माध्यम आहे असे या तत्वात अग्रहृत आहे.

कला तत्त्व : प्रत्येक प्रदेशात त्या त्या लोकजीवनाला प्रभावित करणाऱ्या कलाव्यवहारांचा हीत असतो. कलाव्यवहाराचा हा आविष्कार त्या त्या भूमीशी आणि तिथल्या मानवी-मानवेत्तर अशा एकूणच जीवनव्यवहाराशी निगडीत असतो. भाषा, संचीत, चित्रकला, मूर्तीकला, ललितकला आदींवर तिथल्या देशीय मूल्यांचा मूर्त-अमूर्त प्रभाव असतो. विशेषत लोककलांचा आविष्कार हा अस्सल त्या त्या प्रदेशाशी निगडित देशीय तत्त्वांचा आविष्कार असतो. कला तत्त्वे ही देशीयच असतात आणि देशीय रूपातील त्यांच्या आविष्कारानेच त्या त्या प्रदेशात त्यांना लोकमान्यता मिळते. मातृभाषा, देशीय, रुपबंध, साहित्यातील देशीय परंपरा, येथील संस्कृती आदींमधून साहित्यातील देशीयता' मूर्त रूपात अवतरते. देशीय असलेले आणि आपल्या भूमीतत्त्वाशी निगडित असलेलेच साहित्यात जगात मोठे ठरत असते. आपल्या कलाव्यवहारानुसारच आपली देशीय कालतत्त्वे सिद्ध होतात आणि मीमांसेठही तो रूढ होतात, नव्हे व्हायला हवी.

आक्रमकता तत्त्व : देशीयतेचे हे तत्व लढाऊ आणि आग्रही वृत्तीचे प्रतीक आहे. देशीयतेवर जेव्हा परक्या भाषा-संस्कृतीचे आक्रमण होते आणि आपले आत्मतेज हिरावून घेण्याचे प्रयत्न होतात तेव्हा तेव्हा देशीयता हो आक्रमक होवू लागते आणि आपली अस्मिता, आत्मतेज, आत्मसन्मान, मातृभाषा, संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आक्रमकपणे दुसऱ्या संस्कृतीला सामोरे जाते. म्हणूनच आक्रमता हे देशीवादात रुपांतरित करणारे तत्त्व आहे.

समारोप : **(Conclusion )**

देशीयतेचे जे काही तत्त्वज्ञान, मूल्यव्यूह, मूल्यविचार आजवर अनेक देशीय तत्त्वचिंतकांनी सिद्ध केले आहे , त्यामागे त्यांच्या देशीय सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीच्या इतिहासाचे सत्याग्रही आकलन असल्याचे दिसून येते. उदा. उत्तर अमेरिकेतील राल्फ क्लिटनने मांडलेले देशीयवादी चळवळीचे तत्त्वज्ञान आणि निरीक्षण मराठी भाषेचा विचार करता महानुभावांपासून तर संतापर्यंत-फुले-आंबेडकर एक मोठी देशीय विचार परंपरा मांडता येते, आधुनिक काळाचा विचार केला तर एकोणिसाव्या शतकात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, डॉ. भालचंद्र नेमाडे हे दोन मोठे विचारवंत साहित्यातील देशोयतेचा पुरस्कार करणारे आणि देशीयतेची मांडणी करणारे आहेत. असे दिसून येते.

**संदर्भ : (bibliography)**

१} सानप किशोर, देशीयवाद आणि मराठी साहित्य समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर (प्रकाशनाधीन ), पू. ११, १२..२) तत्रैव पू. १३.

३) पाटील चंद्रकांत, उद्धृत आणि म्हणूनच, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८८, पु. ८५.

४) उनि, सानप किशोर, पृ. १४.

५) तत्रैव पू. १४, १५